# प्रेसनोट

दि.२०/०६/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.६५४/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | सुधाकर श्रीरंग मुंढे वय–५७ वर्ष, पद–गटविकास अधिकारी, वर्ग–१, नेमणुक पंचायत समिती राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे सेवानिवृत्त ग्रामसेवक असून त्यांच्यावर गटविकास अधिकारी, राहुरी यांच्या अहवालावरुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांनी निलंबनाची कारवाई केली होती. त्यानंतर तक्रारदार हे सेवानिवृत्त झाले होते. त्यांचे वरील दोषारोप पत्राचा अहवाल गटविकास अधिकारी यांनी पाठवायचा तो अहवाल तक्रारदार यांच्या बाजूने पाठविण्याकरीता आरोपी लोकसेवक सुधाकर श्रीरंग मुंढे, पद–गटविकास अधिकारी, वर्ग–१, नेमणुक पंचायत समिती राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे १०,०००/– रुपये लाचेची मागणी केली. दि.२०/०६/२०२५ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक सुधाकर श्रीरंग मुंढे, गटविकास अधिकारी यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन १०,०००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर